# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १७.०७.२०२६ शुक्रवार**

**मा. अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रभाग कार्यालय येथे गुन्हेगारांचा आदान–प्रदान कार्यक्रम संपन्न :–**

दिनांक १६.०७.२०२६ चे १०.०० वा., मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनातून नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध १७ पोलीस ठाणे येथे अटक व गुन्हे अभिलेखावरील सक्रीय असे एकूण ७९ आरोपींचे आदान–प्रदान हे पोलीस नियंत्रण कक्ष परिसरातील मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) कार्यालय येथे पार पडले. आदान–प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत, याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी यांचे प्रमुख उपस्थितीत मा. सहायक पोलीस आयुक्त (अजनी विभाग) श्री. नरेंद्र हिवरे, श्री. रोहीत ओव्हाळ (कळमणा विभाग), श्री. रोशन पंडीत (सक्करदरा विभाग) तसेच, आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील एकूण १२ अधिकारी व ३५ अंमलदार आरोपीसंह हजर होते.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली बाबत उपस्थीत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समजावुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा सुचना दिल्या.

अशाचप्रकारे नागपुर शहरातील पोलीस ठाणे अंतर्गत अटक आरोपींना आठवड्याचे प्रत्येक मंगळवार रोजी पोलीस भवन येथे आणि पोलीस ठाणे अभिलेखावरील सक्रीय गुन्हेगारांना बुधवार रोजी प्रादेशिक विभाग स्तरावर प्रत्यक्ष हजर करून आदान–प्रदान कार्यक्रम होणार आहे.





**(कामगिरी)**

**१) एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

दिनांक १७.०७.२०२६ चे १३.४० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, बाभळे ले आऊट येथील मोकळया मैदानात एक तडीपार हद्यपार इसम घातक शस्त्रासह धुमधाम करत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम हातात शस्त्र घेऊन येणारे जाणारे लोकांना शिवीगाळ करतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व निशस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव संघर्ष उर्फ सन्नी मोहन मेश्राम वय २४ वर्षे रा. आंनद नगर, वानाडोंगरी, एमआयडीसी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातून एक लोखंडी धारदार चाकु किंमती १००/—रू. चा जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२६, दिनांक २५.०५.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (अति.कार्य. एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. गोकूळ महाजन, पोहवा राजेश वरठी, पोअं. सचिन, मुरलीधर व मनोज यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे पारडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी नामे सर्वनन के. कुंडप्पन वय ४६ वर्ष रा. ३/२६, मुरुमपत्ती, पोस्ट अनाईपल्लम, ता. राशीपुरम, जि. नामक्कल, तामिळनाडू हे ट्रक क्र. टीएन ३३ बीके ९५८३ यावर क्लीनर असुन, ते ट्रकचालक नामे शिवप्रकाश टि. ठियागराजन एस. वय ३२ वर्ष रा. १४ अ, सिंथा मंगलम, पिरीवू रोड, कामराज नगर, ता. राशीपुरम, जि. नामक्कल, तामिळनाडू याचेसह दिनांक १४.०७.२०२६ रोजी ०८.०० वा. तामिळनाडू येथून ट्रक क्र. टीएन ३३ बीके ९५८३ मध्ये नारळाचा माल घेऊन, कानपूरकडे निघाले होते. दिनांक १७.०७.२०२६ चे ०३.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे पारडी हद्यीतील जबलपूर—हैदराबाद हायवे रोडवरील श्री सेलिब्रेशन लॉन समोर फिर्यादीचे ट्रकसमोर चालणारा ट्रक क्र. एमएच ३९ एन ५९५३ चा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रकचे अचानक ब्रेक दाबल्याने, फिर्यादीचे त्यांचे ताब्यातील ट्रकवरील संतुलन बिघडून त्यांचा ट्रक आरोपीचे ट्रकला मागून धडकला. त्यामुळे फिर्यादीचे ट्रकचे केबिन दबल्याने फिर्यादी व त्यांचा सोबती ट्रकचालक नामे शिवप्रकाश टि हे दोघे गंभीर जखमी झाले. आरोपी ट्रक चालक घटनास्थळावर ट्रक सोडून पळून गेला. लोकांना गंभीर जखमी यांना ट्रकचे केबिन बाहेर काढून उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी ट्रकचालक शिवप्रकाश टि यांना तपासुन मृत घोषीत केले. फिर्यादी यांचा उपचार सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या बयानावरुन पोलीस ठाणे पारडी येथे पोउपनि. सचिन ठाकरे ८२०८५६९८२३ यांनी आरोपी ट्रक चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१),१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४, (अ)(ब),१७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. वाहन चालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०७.२०२६ चे १०.०० वा. ते दिनांक १६.०७.२०२६ चे १०.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत टेकडी रोड नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी कु. प्रणाली योगेश जरगर वय २६ वर्ष यांची आई नंदुरबार येथे गेल्याने, फिर्यादी यांनी आपले राहते घराला कुलुप लावुन, त्यांचे मैत्रिणीचे घरी अभ्यास करण्याकरीता गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, किचनमधील लोखंडी आलमारीचे लॉकरमधील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,५०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. अमोल नागरीक ९६०४५८०२०८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे गणेशपेठ :—** दिनांक १६.०७.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत कांजी हाऊस रोड, कॉटन मार्केट येथे एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन— रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट १ इंच, केस—काळे व वाढलेले, अंगात—पांढरे निळ्या रंगाच्या पट्टया असलेला टि—शर्ट व राखाडी रंगाचा पायजामा घातलेला आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी शेख रमजान शेख समशेर वय ४९ वर्ष रा. कर्नलबाग, रामाजीची वाडी, गणेशपेठ, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. विक्रम सोनवणे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे अजनी :—** दिनांक १७.०७.२०२६ चे ०६.०० वा. चे सुमारास, फिर्यादीच्या पत्नी नामे सौ. कोमल नरेश कोंबाडे वय ३६ वर्ष हया आपले राहते घरी कुलरमध्ये पाणी भरत असतांना, त्यांना अचानक ईलेक्ट्रीक करंट लागल्याने त्या खाली पडुन बेशुध्द झाल्या. फिर्यादीने त्यांना उपचाराकरीता वैरागडे हॉस्पिटल मानेवाडा रोड व तेथून गंगाकेअर हॉस्पिटल, रामदासपेठ येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी नरेश चंद्रभान कोंबाडे वय ४६ वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. अंकित अंबेपवार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**मिसिंग)**

**पोलीस ठाणे कोतवाली :—** श्रीमती दिपाली प्रशांत यादव वय ३७ वर्षे, रा. भुतेश्वर नगर, गणेश मंदीर जवळ, रमेश काळेचे घरी, कोतवाली, नागपूर ह्या दिनांक १२.०७.२०२६ चे ०६.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट ४ इंच, केस—काळे लांब, अंगात— काळी पांढरी साडी व लाल ब्लाऊज घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



श्रीमती दिपाली

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०४०११२ /१९९६ | कलम ३८०,३४ भा.दं.वि. | १) कमालसिंग शिव<br>२) करतारसिंग शिव दोन्ही रा. आमदार निवास, सरव्हंट क्वॉर्टर क्र. २९, सिताबर्डी, नागपूर | १८.०७.२०२६ |
| २. | मा. १७वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०४००९८ /१९९६ | कलम ३२४,५०४ भा.दं.वि. | शेरु उर्फ रतन सुर्यवंशी रा. गड्डीगोदाम, दर्शन कॉलनी झोपडपट्टी, सदर, नागपूर | २१.०७.२०२६ |
| ३ | मा. १८वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०४००२६ /१९९८ | कलम ३७९,३४ भा.दं.वि. | रामलाल मरसकोल्हे वय २४ वर्ष रा. खलाशी लाईन, नागपूर | २१.०७.२०२६ |
| ४ | मा. १७वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०४०२२८ /१९९७ | कलम ३८० भा.दं.वि. | रतन पाटील रा. गड्डीगोदाम पोलीस चौकी जवळ, बुध्द विहाराजवळ झोपडपट्टी, पप्पु वैद्यचे घरी, सिताबर्डी नागपूर | १८.०७.२०२६ |
| ५ | मा. जिल्हा न्यायाधीश –२० तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नागपुर. | ५३८/ २०१६ | कलम ३०७,३४ भा.दं.वि. | आरीफ खान उर्फ कुजली नदीम खान रा. गोवा कॉलनी, मंगळवारी फुलबजार जवळ, कामठी रोड, जरीपटका, नागपूर | २२.०७.२०२६ |
| ६ | मा. १६वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०३०८५/ २००६ | कलम ४,२५ भा. हत्यार कायदा | सुनिल रामदास बहुरीया रा. जय अंबेनगर, प्लॉट क्र. ३६०, गजानन अरमोरे यांच्या घरी, कळमणा, नागपूर | २१.०७.२०२६ |
| ७ | मा. १६वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय | ३०२५४९/ २००६ | कलम ३७९,४११ ,३४ | १)योगिता रामाजी ढोक रा. पुनापुर चौक, भवानी मंदीर रोड, प्लॉट क्र. २०, कळमणा, नागपूर | २२.०७.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दंडाधिकारी, नागपुर. | | | २) उमेद दशरथ शाहू रा. शिवम सोसायटी, अभय नगर, राम मंदीर रोड, तिहारु यादवचे घरी किरायाने, कळमणा, नागपूर | |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**